# मसुदा इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री भैरवनाथ अर्थ मूव्हर्स एन्ड कंपनी, मोहिते हाऊस, २४०/बी, जनरल थोरात मार्ग, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ०००३, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित घुंगूर बॉक्साईट ब्लॉक-I, गट क्रमांक – ६८५ (भाग), गांव-घुंगूर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे (प्रकल्प श्रेणी "बी" ) प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र १४.२४ हेक्टर खाण क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,८०,००० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री भैरवनाथ अर्थ मूव्हर्स एन्ड कंपनी, मोहिते हाऊस, २४०/बी, जनरल थोरात मार्ग, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ०००३, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित घुंगूर बॉक्साईट ब्लॉक-I, गट क्रमांक – ६८५ (भाग), गांव-घुंगूर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे (प्रकल्प श्रेणी "बी" ) प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र १४.२४ हेक्टर खाण क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,८०,००० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शनिवार, दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्राथमिक शाळा-सावरवाडी, गांव-घुंगुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रमोद राजाराम माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जयवंत हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व तदनंतर सुधारित अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच त्यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक

असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे असे सांगितले. त्यापुढे आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. श्री भैरवनाथ अर्थ मूव्हर्स एन्ड कंपनी, मोहिते हाऊस, २४०/बी, जनरल थोरात मार्ग, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ०००३, महाराष्ट्र राज्य यांचा त्यांच्या प्रस्तावित धुंगूर बॉक्साईट ब्लॉक-I, गट क्रमांक – ६८५ (भाग), गांव-घुंगूर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे (प्रकल्प श्रेणी "बी" ) प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र १४.२४ हेक्टर खाण क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,८०,००० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज दाखल केला होता.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ब – १ अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ मार्च, २०२२ ते ३१ मे, २०२२ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आलेला आहे.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक २५०२२८-FTS-0176 दिनांक २८-०२-२०२५ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली होती. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अनुमतीने पर्यावरणविषयक जनसुनावणी शनिवार, दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्राथमिक शाळा-सावरवाडी, गांव-घुंगुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली होती. तदनंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-२७/ २०२५, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०४०३-एफटीएस-०२९७, दिनांक ०३-०४-२०२५ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल

मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,कोल्हापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| **२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी - कोल्हापूर,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>कोल्हापूर | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २४-०३-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते —

१ मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
२ महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर,
३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, कोल्हापूर,
४ मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रायल, मुंबई ३२
५ सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई.
६ उप विभागीय अधिकारी, पन्हाळा, जिल्हा — कोल्हापूर,
७ प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर
८ तहसीलदार, तहसील कार्यालय, पन्हाळा, तालुका-पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर.
९ तहसिलदार, तहसील कार्यालय, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर.

१० गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शाहूवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर.

११ ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये, बांदिवडे, तालुका-पन्हाळा, जि. कोल्हापूर.

१२ ग्रामपंचायत खोतवाडी/सावर्डे/परखंदळे/नंदगांव/अंबर्डे / परळी/घुंगुर, ता. शाहुवाडी, जिल्हा-कोल्हापूर.

१३ संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

तदनंतर आयोजकांनी आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर व इतर कार्यालयाकडून दि. २५.०४.२०२५ अखेर १९८ सूचना/आक्षेप टपालाव्दारे व ई-मेल व्दारे प्राप्त झाले असल्याचे सांगितले. तसेच यांनी सदर सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) पीपीटी सादरीकरण केले.

त्यामध्ये पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारच्या भारतीय खाण ब्युरो (IBM) ने प्रस्तावित प्रकल्पाचा खाणकाम आराखडा दिनांक ३१-०७-२०२० रोजी मंजूर केलेला आहे. तसेच प्रस्तावित

प्रकल्प क्षेत्र १४.२४ हेक्टर (वनजमीन) असून खाण क्षेत्रातून बॉक्साईटच्या १,८०,००० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेचा प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे. प्रकल्पाची भांडवली किंमत ही ₹ २.१९ कोटी एवढी आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. प्रकल्पात कुशल आणि अकुशल संवर्गातील ३५ व्यक्तींची गरज असुन प्रकल्पातील रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. मात्र सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल याबाबत माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी प्रकल्पाचे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी अंदाजपत्रक सुमारे ₹ ४०.९० लाख असून सदरहू तरतुद पाच वर्षांसाठी आहे. प्रकल्प बाधीत गावातच ते खर्च करण्यात येईल. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च ₹ ९५.० लाख असून आवर्ती खर्च ₹ ४२.५० लाख एवढा असेल याबाबतची माहिती दिली. त्याचबरोबर सीएसआर व्यतिरिक्त कंपनीने खाण प्रकल्पासाठी कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी भांडवली खर्चाच्या २% राखीव ठेवलेला असून जनसुनावणी दरम्यान स्थानिकांनी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना अंमलबजावणीसाठी ₹ ४.३९ लाख एवढी रक्कम खर्च करण्यात येणार असल्याबाबत सांगितले. तसेच वन्य जीव कायद्यानुसार वन्यजीव संवर्धन आराखडा तयार करण्यात आलेला असून प्रत्यक्ष सहभागासाठी व अप्रत्यक्ष सहभागासाठी सुमारे ₹ २५/- लाख राखीव ठेवण्यात आल्याबाबतची माहिती दिली व सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे असे सांगितले.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील. त्यापुढे मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला आपले मत मांडण्याची संधि देण्यात येईल असे सांगून उपस्थितांना आपले मत मांडण्यास सुरुवात करावी असे सांगितले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री पांडुरंग संकपाळ, राहणार देसाईवाडी, तालुका- पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर:-**

मी घुंगूर बॉक्साईट ब्लॉक -I या प्रकल्पास पाठिंबा देण्यासाठी उपस्थित आहे. आमचा तालुका हा दुर्गम असल्याने येथे रोजगाराची संधि नाही, त्यामुळे येथील स्थानिकांना येथून मुंबई पुण्याला जावे लागते व त्यामुळे ६-६ महिने गावाला येताच येत नाही ही परिस्थिती आमच्या वडिलोपार्जितांपासून चालू असल्याचे नमुद करुन आता ते दगदगीचे जीवन आम्हांला नको असल्याबाबत सांगितले. त्यासाठी आम्हांला गावात, गावाजवळ रोजगाराची निर्मिती झाली पाहिजे व त्यासाठी आम्ही स्थानिक जनता प्रकल्पास पाठिंबा देण्यासाठी आलेलो आहे, तरी सदरहू प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा व त्यासाठी शासनाने लवकरात लवकर मान्यता द्यावी असे मत मांडले.

२) **श्री राजाराम पांडुरंग पाटील, राहणार-घोटवडे, तालुका- पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर:-**

घुंगुर पंचक्रोशीतील सर्वांगीण विकासासाठी या बॉक्साईट प्रकल्पास माझा पाठिंबा आहे तसेच, स्थानिक बेरोजगारांना रोजगाराची संधि उपलब्ध होणार असून रोजगारासाठी ५० कि.मी. लांब जाणा-या स्थानिकांना गावाच्या परिसरातच रोजगार मिळणार आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी हा प्रकल्प उभारणीस गेले १४ वर्षे कष्ट घेतलेले असून त्यासाठी माझा जाहिर पाठिंबा.

३) **श्री रामचंद्र शिवाजी तांदळे, सदस्य, निवडे ग्रामपंचायत, तालुका-पन्हाळा, जिल्हा-कोल्हापूर:-**

येथील स्थानिक गोरगरिब जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन एका शेतक-याच्या मुलाने एक प्रकल्प उभा करण्याचे ठरविले आहे तसेच येथे रोजगार नसल्याने येथील तरुण मुलांना गाव, शेतीवाडी सोडुन पुणे, मुंबईला जावे लागते. तरी येथेच रोजगार मिळाल्याने त्यांना कुटुंबाबरोबर राहून शेती करता येईल व त्यांचे कुटुंब सुखी होईल. तरी निवडी ग्रामपंचायतीच्या वतीने या प्रकल्पास जाहिर पाठिंबा देत असून या प्रकल्पास आमची सहमती आहे.

४) **श्री सरदार वसंत कांबळे, राहणार-घुंगूर गाव, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर, कार्याध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया,शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

आपण सर्वांनी कोरोना काळ अनुभवलेला आहे. कोराना काळात शहरातून लोकांची गावाकडे धाव होती. ते लोक स्थानिक गावात रोजगार नसल्याने गाव, तालुका सोडून रोजीरोटीसाठी शहरात गेलेली होती. येथे उद्योग निर्माण झाल्यास येथील भूमीपुत्रांना रोजगार मिळेल. तरी यासाठी बॉक्साईट प्रकल्पास पाठिंबा राहिल. प्रकल्पास पाठींबा.

५) **श्री संदीप केसरकर, राहणार-घुंगूरवाडी, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

माझा या प्रकल्पास गेले दहा वर्षे विरोध आहे व माझा कोणाशीही वैयक्तिक विरोध नाही, मात्र या प्रकल्पास विरोध आहे. कारण माझ्या गावास येणारे पाणी हे डोंगरातून येत आहे व ते पाणी या प्रकल्पामुळे बंद होईल. तसेच डोंगरावर असणारे अतिशय सुंदर, दाट जंगल तोडले जाईल व तेथील प्राणी म्हणजे गवा, डुक्कर, बिबट्या यांच्या जीवनावर परिणाम होईल. त्याचबरोबर बिबट्याचा वावर येथे

गेले वर्षांपासून आढळतो व रोज गवा, बिबटे आमच्या रानात/शेतात येतात. याबाबत प्रकल्पाचे अधिकारी सांगतात की प्रकल्पामुळे या गावात रोजगार उपलब्ध होतील पण स्थानिकांना कुठल्या प्रकारचे रोजगार उपलब्ध होतील हे सांगत नाहीत. तसेच येथील गोरगरीब लोक उत्खननासाठी जेसीबी, मशिन्स, ट्रॅक्टर, डंपर घेऊ शकत नाही. जर प्रकल्पाने रोजगार द्यायचा असेल तर येथे १५० एकर सरकारी जमिन आहे ती प्रकल्प धारक यांनी डोंगर उध्वस्त करण्यास जेवढी मेहनत घेतील, तेवढी मेहनत या जमिनीवर घेऊन उद्योग उभा करण्यास घेतली तर त्यास आमचा पूर्ण पाठिंबा असेल. त्यामुळे आमचा सदरहू प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

त्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मुद्दा लक्षात आल्याचे मत व्यक्त केले.

६) **श्री दिपक आनंदा पाटील, राहणार ननुंद्रे, ता. पन्हाळा-शाहूवाडी पर्यावरण बचाव कृत्ती समिती:-**

या प्रकल्पासाठी प्रकल्प प्रवर्तक यांनी बरीच मेहनत घेतलेली आहे व येथील ब-याच लोकांचे मत आहे की बॉक्साईट उत्खनन सुरु केल्यानंतर पाण्याचा स्त्रोत कमी होतो. तर बॉक्साईट हे असे खनिज आहे की ज्याच्यावर पाणी पडल्यास ते कुठल्याही प्रकारे शोषले जात नाही व ते वाहून जाते. तसेच बॉक्साईट काढल्यानंतर तेथे वृक्षारोपण केल्यास पाणी शोषले जाईल. तरी माझी विनंती आहे की सर्व पर्यावरणाच्या अटी व शर्ती यांच्या अधिन राहूनच या प्रकल्पास शासनाने मंजूरी द्यावी. या प्रकल्पामुळे परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल, म्हणजे चहाची दुकाने, दुचाकी पंक्चर काढणे, मोबईल दुरुस्ती दुकाने यातही रोजगार मिळू शकतो.

यावेळी काही लोक गटाने प्रकल्प विरोधाच्या घोषणा देत असताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यास प्रतिबंध करुन बैठकीत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थित केलेल्या मुद्द्यांव्यतिरिक्त इतर मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत असेही आवाहन केले.

७) **श्री सचिन गोपाळ केसरकर, राहणार-घुंगूर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-**

या जनसुनावणीची माहिती ग्रामपंचायतीस कळविलेली नाही व ग्रामपंचायतीस नोटीस देणे आवश्यक होते. तसेच येथे पन्हाळा तालुक्यातीलच लोक आलेले आहेत व प्रस्तावित प्रकल्प हा घुंगूर गावात होणार असून अगदी थोड्या प्रमाणात घुंगुर ग्रामपंचायत क्षेत्रातील लोक आहेत त्यामुळे येथे बाहेरिल गावातीलच लोक जास्त आलेले आहेत.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले ही जनसुनावणी असल्याने येथे सर्वांनाच उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य आहे, अधिकार आहे. तरी कोणाच्याही उपस्थितीविषयी आक्षेप उपस्थित करु नये व अध्यक्ष यांनी सदरहू प्रकल्पास विरोध करणा-यापैकी चार प्रतिनिधींना आपल्या सूचना/ आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

त्यापुढे श्री सचिन गोपाळ केसरकर यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की आम्ही घरातून बाहेर पडल्यावर लगतच डोंगर आहे व कोकणातील गावांची, डोंगराची काय परिस्थिती झालेली आहे हे आपण पाहतो. त्यामुळे आमचा या प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मुद्द्यांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले. तसेच उपस्थित असलेल्या महिलांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

८) **<u>श्री श्रीकांत अप्पाजी खोत,राहणार-घुंगूरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

मी घुंगूरवाडीचाच रहिवाशी आहे. येथे काही लोक प्रकल्पास विरोध करत आहेत, ते व्देषापोटीच बोलत आहेत. त्यामुळे हा प्रकल्प झालाच पाहिजे ही माझी न्रम विनंती आहे कारण या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे तरी हा प्रकल्प झालाच पाहिजे.

येथे अध्यक्ष यांनी प्रत्येकालाच आपली भूमिका मांडण्याचे स्वातंत्र्य असून ती ते मांडत आहेत असे मत मांडले.

९) **<u>श्री संतोष पाटील, राहणार-घुंगूर गाव, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

हा प्रकल्प येथून एक कि.मी. अंतरावरिल डोंगरावरच होत आहे त्यामुळे डोंगरावर वावरणारी जनावरे म्हणजे गवा, डुक्कर, वाघ यांच्या अधिवासावर आक्रमण होऊन ते डोंगराखालील लोकवस्तीत येतील व त्या वनचरांमुळे लोकांना धोका पोहचू शकतो, त्याचप्रमाणे त्यामुळे शेतीचेही नुकसान होऊ शकते. तसेच प्रस्तावित प्रकल्पामुळे पाण्याची पातळी खालावली जाईल व स्थानिकांच्या बोअरचे पाणी जाईल. त्यामुळे शेतीला पाणी मिळणार नाही. सदरहू प्रकल्पासाठी डोंगर फोडावा लागणार आहे आणि विविध मशिन्सच्या वापराने डोंगराजवळील जमिन ही खचणारच आहे. त्यामुळे काही वर्षांपूर्वी माळीण गावात जी दुर्घटना झाली, तशी दुर्घटना येथे होऊ शकते. जरी आम्ही प्रकल्पाच्या, रोजगाराच्या विरुध्द नाही, पण माणसे व चांगले पर्यावरण राहिलेच नाही, तर प्रकल्पाचा काहीही उपयोग नाही. येथे स्थानिकांचा विरोध का आहे हा मुद्दा लक्षात घेण्यात यावा असे मत नमुद केले.

त्यापुढे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना तोच तोच मुद्दा न मांडण्याची विनंती केली. तसेच प्रकल्पास विरोध असणा-या गटांच्या प्रतिनिधीस सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

१०) **<u>श्री तानाजी रवंदे, राहणार सावर्डे बुद्रुक, ता. शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

माझे गांव या प्रकल्पामुळे बाधित होणार आहे त्यामुळे मी पुढील मुदद्दे मांडत आहे.

**<u>पहिला मुद्दा</u>** – घुंगूर ब्लॉक नं. १ व २ प्रमाणे तेरा खनिज क्षेत्रात बॉक्साईट, कॉपर, आयर्न, लॅटराईट, मॅंगेनिज लॅटराईट यांचा समावेश आहे व प्रकल्पाचे स्थान निवडताना राखीव जंगलाचा भाग बेकायदेशीर वळविला आहे, तसेच शाहूवाडी तालुक्यात परतळे घुंगूर येथील जंगल व राखीव जंगल यामुळे उध्वस्त केले जात आहे असा आमचा आरोप आहे. त्यापुढे त्यांनी या मुदयांबाबत आपले मत काय आहे अशी विचारणा केली.

**<u>दुसरा मुद्दा</u>** – जंगल किंवा राखीव जंगल हे खनिज व पैशाच्या लालसेने बदलणे व जंगलाला बेकायदेशीरपणे जंगल नसलेला भूभाग / क्षेत्र दाखविणे ही गुन्हा आहे का? अशा प्रश्न उपस्थित केला.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी फक्त प्रश्न विचारण्यात येऊ नये, तर सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपले विचार, टीकाटिप्पणी, सूचना, हरकती हे शासनास कळविण्यात येणार आहेत.

**<u>तिसरा मुद्दा</u>** — श्री तानाजी रौंदे यांनी सांगितले की सदरहू बॉक्साईट व इतर खनिजांसाठी कोल्हापूर जिल्ह्यात होणारे विविध प्रकल्प पश्चिम घाटातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात (Environmental Sensitive Zone-ESZ) आहेत, या आरोपांवर उत्तर/स्पष्टीकरण देण्यात यावे.

**<u>चौथा मुद्दा</u>** - सदरील बॉक्साईट खाणीत साठ हेक्टरमध्ये शाहूवाडी तालुक्यातील जंगल जमीनीचा व पठारी भाग पूर्णपणे उध्वस्त होणार आहे, सदरहू प्रकल्प पर्यावरणाची हानी करणारा आहे तसेच जैववैविधता नष्ट होण्याची भिती असलेला गंभीर विषय आहे, असे आपणास वाटत नाही का?

**<u>पाचवा मुद्दा</u>** - सह्याद्रीतील व्याघ्र संरक्षित जंगल, जमिन या बॉक्साईट व लॅटरेट खाणीमुळे प्रभावित होणार आहे तसेच वन्यजीव संरक्षण कायद्याचे पर्यावरण कायद्याचे व इतर विविध जैववैविधतेचे कायमस्वरुपी नुकसान होणारा हा प्रकल्प आहे यावर आपले मत काय आहे?

**<u>सहावा मुद्दा</u>** - सदर बॉक्साईट मायनिंग प्रकल्पामुळे एकाचवेळी सह्याद्री पर्यावरण संवेदनशील जंगल व्याघ्र संरक्षित विभाग, सह्याद्री टागर रिझर्व ते रत्नागिरी संरक्षित जंगल असा संपूर्ण मोठा भाग नष्ट करुन त्याची हानी करुन निसर्ग व येथील बहुविविधता असलेली परिसंस्था नष्ट करणारा यावर आपले काय उत्तर आहे?

**<u>सातवा मुद्दा</u>** - परळी, आंबर्डे, सावरडे बुद्रुक, घुंगुर या भागातील जंगलामध्ये बिबट्या, वाघ, गवे, रेडे, हरिण, सांबार, ससा, रानडुकरे, खवल्या मांजर, पक्षी, मोर, घोरपडी इ. अनेक जंगली प्राणी व पक्षी कोल्हापूर जिल्ह्यातील जंगलात व प्रस्तावित बॉक्साईट प्रकल्प क्षेत्राच्या भागात आहेत की नाहीत? यापूर्वीसुध्दा कोल्हापूर जंगल क्षेत्रात व पश्चिम घाट क्षेत्रात, पर्यावरणीय संवेदनशील भागात खाणी नकोत असेच स्थानीक जनतेने मागणी केलेली असून पूर्वी झालेल्या जनसुनावणीतील आक्षेपांबाबत आपण काय दखल घेतली? पर्यावरणीय जनसुनावणी हे एक नाटक आहे काय?

**<u>आठवा मुद्दा</u>** - कोणतीही कायद्याची प्रक्रिया न करता जंगल, जमिनी राखीव व्याघ्र प्रकल्पाची जागा, पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र खाणीसाठी ताब्यात घेण्याचा बेकायदेशीर जमिन वापराचा पॅटर्न बदलणे चुकीचे नाही का? तसेच जमिन वापराचा पॅटर्न बदलणे, पर्यावरण कायद्याची मोडतोड करणे हे करण्यात येत आहे असे नाही का?

**<u>नववा मुद्दा</u>** - हा जो प्रकल्प बाधित भाग आहे, त्यात सोनुरले जे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात येते, त्या लगतचा भाग आहे. याच कुठल्याही प्रकारचे अंतर नाही. कारण इको सेनसेटीव्ह लगतचा भाग हा बफर झोन असतो. त्यामुळे तेथेही प्रकल्पास परवानगी देता येणार नाही.

**११) <u>श्री यशवंत लवटे, राहणार-पेढेवाडी परखंदळे, तालुका- शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

बैठकीत सर्व उपस्थितांच्या सह्या घेण्यात येत आहेत. त्या सह्या पाठिंब्यासाठी घेण्यात येत आहेत काय वा फक्त दाखविण्यासाठी सह्या घेत आहेत?

त्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या बैठकीस उपस्थित होता, याबाबतची स्वाक्षरी आहे, ना पाठिंब्यासाठी, ना विरोधासाठी ही स्वाक्षरी आहे असा खुलासा केला.

त्यावर श्री लवटे यांनी मत मांडले की पाठिंब्यासाठी याचा वापर होईल असे येथील स्थानिकांना वाटते.

तदनंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की व्हिडिओ रेकॉर्डींग करण्यात येत असून व्हिडो रेकॉर्डिंगची कॉपी आपण माहिती अधिकारात मागवू शकता. या बैठकीच्या इतिवृत्ताची मराठी व इंग्रजी प्रत हीसुध्दा आपण माहिती अधिकारात मागवू शकता तसेच बैठकीचे इतिवृत्त हे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असते. त्यामुळे बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या व्यक्तीचा व अध्यक्ष यांचा शब्द न शब्द इतिवृतात घेण्यात येईल. तसेच ही जनसुनावणी ही पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २०१६ नुसार पारदर्शक पध्दतीने व शांततेने पार पडत असून उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्यास पुरेशी संधि देण्यात येत आहे याची नोंद उपस्थितांनी घ्यावी.

त्यावर श्री लवटे यांनी आक्षेप नोंदविला की मंडालाच्या तलावाच्यावेळी आम्ही जिल्हाधिकारी यांना परवानगी मागितली होती, त्यावेळी वन विभागाने अहवाल दिलेला होता की येथील जंगल भरपूर प्रमाणात नष्ट होणार आहे. आता बॉक्साईटसाठी प्रस्ताव वन विभागास मागितला असता त्यांनी येथे जंगल अजिबात नसल्याचा अहवाल दिला आहे. तसेच काही अधिकारी हे शासनाची याबाबत दिशाभूल करत आहेत व लोकांची फसवणूक करत आहेत त्यासाठी हा प्रश्न विचारणे मला भाग पडलेले आहे. जर ही जनसुनावणी व्हायचीच असेल तर अशाप्रकारे न करता प्रकल्प बाधीत गावोगावी गुप्त मतदान घेण्यात यावे. त्यामुळे कोणाचा विरोध, कोणाचा पाठिंबा हे कळेल. कारण येथे जे लोक आणण्यात आलेले आहेत, हे लालसेपोटी, स्वतःच्या स्वार्थासाठी आलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की कोणाच्याही उपस्थितीविषयी आक्षेप नोंदविण्यात येऊ नयेत व आपण आपली भूमिका मांडण्याची सूचना केली. त्यावर श्री लवटे यांनी सूचना केली की या प्रकल्प स्थापनेविषयी प्रकल्प बाधित गावात गुप्त मतदान घेण्यात यावे. त्यानंतर पुढील निर्णय घेण्यात यावा. ही आमची मागणी शासनास कळविण्यात यावी.

त्यास अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी शासनास कळविण्याचे आश्वासन दिले.

**१२) <u>श्री मानसिंग सावरे, राहणार-घुंगुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-</u>**

या प्रस्तावित प्रकल्पाबाबत मी हरकती घेणार असून माझे मुद्दे हे खालीलप्रमाणे आहेत-

आमच्या गावातील लोक या प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या सूचना, हरकती वा आक्षेप माझ्यानंतर मांडतीलच. मात्र स्थानिकांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी भावना मी सांगत आहे. तसेच स्थानिकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी जनसुनावणीबाबत जे पत्र मिळाले, ते पंधरा दिवस उशिरा मिळाले आहे, जर सदरहू प्रत ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाने स्थानिकांना बैठकीबाबत अवगत करणे, गावागावात दवंडी पिटवून लोकांना सदरहू बैठकीचे

ठिकाण, बैठकीची वेळ माहित करणे आवश्यक होते. या गावातील बरेच ग्रामस्थ त्यासाठी ग्रामसभा बोलविण्यासाठी वारंवार मागणी करत आहेत व सदर प्रकल्पाबाबत माझे मुद्दे पुढे मांडत आहे-

<u>हरकत क्रं.१-</u>

प्रस्तावित खाण प्रकल्प हा पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (ESZ-Environmental Sensitive Zone) मोडत आहे व पश्चिम घाट हे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र असून जैवविविधतेने अतीसमृध्द आहे. तसेच जागतिक स्तरावर पश्चिम घाट महत्वाचा मानला जातो ही वस्तूस्थिती असतानाही अशा संवेदनशील क्षेत्रात खाणकामाचे पर्यावरणविरोधी प्रकल्प सुरु करणे बेकायदेशीर आहे. तरी प्रस्तावित खाणकाम प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये ही माझी मागणी आहे.

<u>हरकत क्रं.२-</u>

खाण प्रकल्पामुळे येथील समृध्द, अतिदुर्मिळ जैवविविधता कायमस्वरुपी नष्ट होईल जी पुन्हा तयार करता येणार नाही. तसेच खाणकामामुळे पर्यावरणाचा -हास होऊन अनेक गंभीर पर्यावरणीय प्रश्न, समस्या निर्माण होऊन नागरिकांना जगणेही कठिण होऊन जाईल.

<u>हरकत क्रं.३-</u>

खाण प्रकल्प परिसरात वाघांचा भ्रमण मार्ग (tiger movement) आहे व या प्रकल्पामुळे वाघांच्या स्थलांतर प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊन वाघांच्या अस्तित्वावर धोका निर्माण होईल.

<u>हरकत क्रं. ४-</u>

खाण प्रकल्प परिसर हा बिबटे, गवे, वाघ आणि इतर वन्य प्राण्यांचे निवासस्थान आहे. तसेच खाणकाम प्रकल्पामुळे वन्यप्राणी विचलित होऊन वन्यप्राणी व मानव यांच्या संघर्षाचे प्रमाण वाढीस लागेल. त्यामुळे हे संघर्ष वन्यप्राणी व मानव या दोघांनाही धोक्याचे असतील याचा गांभार्याने शासनाने विचार करावा ही विनंती आहे.

<u>हरकत क्रं. ५-</u>

खाण प्रकल्पामुळे परिसरातील हवेचे, पाण्याचे प्रदूषण होईल. ध्वनी प्रदूषणात वाढ होईल. त्यामुळे तेथील नागरिक आणि वन्यजीव यांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. तरी खाणकाम प्रकल्पास मान्यता मिळू नये अशी आमची विनंती आहे.

<u>हरकत क्रं.६-</u>

केंद्रीय जल पर्यावरण मंत्रालयाच्या २०२४ च्या अधिसूचनेनुसार शाहूवाडी तालुक्यातील ५२ गावे पर्यावरणीय संवदेनशील यादीत आहेत. यातील अनेक गावे ही प्रकल्प क्षेत्रात आहेत याचा गांभीर्याने विचार होणे महत्वाचे आहे.

**हरकत क्रं.७-**

खाणकाम प्रकल्प क्षेत्र आणि आजूबाजूच्या परिसरात अतिसमृध्द जैवविविधता असून त्याच्या नोंदी आणी खाणकामामुळे जैवविविधतेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (EIA) देण्यात आलेली नाही. यामुळे हा अहवाल अशास्त्रीय आणि अपुर्ण आहे व हा अहवाल नागपूरच्या खाजगी संस्थेने तयार केला आहे की ज्यांना पश्चिम घाट आणि प्रकल्प क्षेत्रातील जैवविविधतेची काडीमात्र संबंध नाही आणि पर्यावरणावाबत तसेच येथील प्राणीशास्त्राचे ज्ञान नाही. त्यामुळे हा अपूर्ण अहवाल स्विकारला जाऊ नये व सदरील अहवाल शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या सहकार्याने वनविभागासोबत घेण्यात यावा. तसेच प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) हा शिवाजी विद्यापीठाने बनवावा अशी आमची प्रमुख मागणी आहे. पश्चिम घाट परिसरातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात येणारे हे खाण प्रकल्प पर्यावरणविरोधी आणी जैवविविधतेचा नाश करणारे असल्याने या खाणकाम प्रकल्पांना मंजूरी देण्यात येऊ नये, अशी आमची स्थानिकांची मागणी आहे.

**हरकत क्रं.८-**

त्याचप्रमाणे हा जो प्रकल्प २२३-वनविभाग परळी, तसेच ६८५-घुंगूर हे पूर्णपणे राखीव वनक्षेत्र विशाळगड व मसाई कन्झर्वेशन यामध्ये नोंदी आहेत. तसेच ज्यांच्या जमिनी आहेत, त्या जमिन मालकांना का बोलाविले नाही? येथे वनविभागाचे प्रमुख बैठकीस असणे आवश्यक होते कारण ज्या वनविभागाची जमिन घेणार आहेत, त्याची माहिती देण्यास वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी का आलेले नाहीत? तसेच वनविभागास अंधारात ठेऊन प्रकल्प चालू करणार आहात असा संशय स्थानिकांना येत आहे.

यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी येथे मत मांडले की संबंधित व्यक्तीस भरपूर वेळ दिलेला असून दुस-या व्यक्तीस भूमिका मांडण्याची संधि देण्यात यावी.

१३) **श्री रणवीरसिंग मानसिंग गायकवाड, संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राहणार सुपात्रे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**

आज सावरेवाडी येथे ही जनसुनावणी पार पडत आहे व या जनसुनावणीसाठी सर्व मान्यवरांचे आभार. तसेच शाहूवाडी तालुका भौगोलिक दृष्ट्या डोंगराळ आहे व वाड्यावस्त्यामध्ये असणारा हा तालुका आहे व डोंगराळ भागामुळे येथे औद्योगिक उद्योगांनी कधिही भरारी घेतली नाही. त्यामुळे येथे उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना ही एकमेव उद्योग संस्था आहे व ज्यामुळे कारखान्यात अनेक गरजुंना रोजगाराची संधि मिळालेली आहे. तसेच येथील बाजारपेठात अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ झालेली आहे व स्थानिकांचे राहणीमानसुध्दा उंचावलेले आहे. सदर प्रकल्प तालुक्यात आल्यामुळे त्या तालुक्यातील लोकांची, शेतक-यांची परिस्थिती सुधारते. येथे सावरेवाडीत बॉक्साईट प्रकल्पास पर्यावरणीय मंजूरी देण्यासाठी जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यात येथील तरुणांना रोजगाराची संधि उपलब्ध होईल. तसेच शेतक-यांची प्रगती ही जिद्दीने करायची आहे व सर्वसामान्य शेतक-यांकडे ट्रॅक्टर आहे त्यांनी आता ट्रक, टिपर घेऊन प्रकल्पात

लाऊन प्रगती करणे अपेक्षित आहे. येथे सर्वजण स्थानिक असून सर्वांनीच या प्रकल्पास पाठिंबा दिलेला आहे. त्याबद्दल आभार व्यक्त करतो.

**१४) सौ. कल्पना युवराज पाटील, राहणार-घुंगुर, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

श्री भैरवनाथ अर्थ मूव्हर्स अँड कंपनी ही प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यासाठीच स्थापन करण्यात आलेली आहे व आजपर्यंत मी उद्योगाबाबत बाहेरुन ऐकत होते आणि २००७ साली डोंगराळ भाग असलेल्या ठिकाणी माझ्या पतीने श्री भैरवनाथ अर्थ मूव्हर्स अँड कंपनीची निर्मीती केली ही माझ्यासाठी व गावातील सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. तसेच पर्यावरणाच्या नावांखाली परिसरातील स्थानिक असंतुष्ट विरोध, पर्यावरण क्षेत्रात जाणकार नसलेले प्रस्तावित बॉक्साईट प्रकल्पास विरोध करत आहेत, ही या गावची खंत आहे. मात्र ब-याच गावक-यांनी या प्रकल्पास पाठिंबा दिलेला आहे, त्यांचे आभार मानते. तरी शासनाने या प्रकल्पास मंजूरी देऊन गावाचे भाग्य उजळवावे अशी मी विनंती करते.

**१५) सौ. शुभांगी कांबळे, सरपंच, घुंगूर ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे. तसचे येथे रोजगाराची संधि नसल्याने येथील तरुणांना दुसरीकडे जावे लागते व या प्रकल्पामुळे गावाला कोणताही धोका होणार नाही याची ग्वाही गावची सरपंच म्हणून तसेच येथील ग्रामस्थ देण्यास तयार आहेत.

**१६) सौ. दिपाली दळवी, ग्रामपंचायत सदस्य, परखंदळे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.**

मी परखंदळे ग्रामपंचायतची सदस्या आहे. शिवरायाच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे व येथील सर्व गावक-यांचा या प्रकल्पास पाठिंबा आहे. पण या खाणीमुळे शेतीचे नुकसान होणार आहे. तसेच कंपनीचे ट्रॅक्टर शेतातून गेला किंवा प्रकल्पातील धुळ शेतात जावून शेतीचे नुकसान होणार आहे त्यामुळे स्थानिक गरीब शेतकरी येथून धान्य कसे पिकविणार? हे आम्हांला सांगण्यात यावे, म्हणून माझा या प्रकल्पाला पूर्ण विरोधच आहे.

**१७) सौ. ललिता संजय खोत, माजी सरपंच, घुंगुर ग्रामपंचायत, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूरः-**

प्रस्तावित प्रकल्पामुळे फक्त तरुणांनाच रोजगार न देता स्थानिक महिलांना, बचत गटांना पदार्थ तयार करुन ते विकण्याची संधि देण्यात यावी व हा प्रकल्प चालू व्हावा हीच माझी इच्छा असून प्रकल्पाचा महिलांनाही फायदा होणार आहे असे मत मांडले.

**१८) नंदा पाटील, गाव-घुंगुर, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूरः-**

मी या गावाची लेक आहे व मी अगदी लहान असल्यापासून या गावात राहते तसेच माझे गाव हे दुर्गम भागात आहे. सदर प्रकल्पामुळे गावाचा विकास होईल, तरी या प्रकल्पास पाठिंबा द्यावा ही मी येथील माझ्या भावांना विनंती करते.

**१९) भाव्या नारायण सुतार, राहणार उंड्री, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर-**

प्रकल्पाचा संकल्प चांगला आहे व चांगल्यासाठी सर्वांनीच चांगलाच पाठिंबा द्यावा ही विनंती.

**२०) श्री प्रकाश कांबळे, राहणार-करगुळे, तालुका-शाहूवाडी,जिल्हा-कोल्हापूर:-**

बैठकीत शाहूवाडी तालुक्यातील बेरोजगारीचा मुद्दा आला व शाहूवाडी तालुका हा डोंगराळ व दुर्गम आहे तसेच येथे कुठल्याही प्रकारचे उद्योगधंदे नाहीत. त्यामुळे असे उद्योग आले तर शाहुवाडी तालुक्यातील बेरोजगारी कमी होईल व प्रकल्पामुळे भूमीपुत्रांना रोजगार मिळेल. आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेनूसार प्रकल्पात काम करणारा फक्त कामगारच नाही, तर परिसरात राहणारा चहाची टपरी चालविणारा, दुचाकी पंक्चर काढणारा, मोबाईल रिपेअर इ. अनेक व्यवसाय या शाहूवाडीत निर्माण होतील व यांनाही या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होईल तसेच शाहूवाडी तालुक्यात उदगीर, धोपेश्वर अशा अनेक माईन्स येणार होत्या. पण या माईन्स शासनाच्या “Eco-Sensitive Zone” मुळे रद्द करण्यात आल्या. या प्रकल्पासाठी ब-याच स्थानिक लोकांनी ट्रक्स, टिपर्ससाठी लाखोंची कर्ज घेऊन गुंतवणूक केली आहे. त्यामुळे प्रकल्प रद्द झाल्याने त्यांचे नुकसान होवू शकते तरी शाहूवाडीतील सर्वांच्याच विकासासाठी सदरहू प्रकल्प लवकरात लवकर चालू व्हावा.

**२१) श्री अनिल दळवी, राहणार परखंदळे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर-**

हीी पाच गावांची जनसुनावणी आहे काय असा मुददा उपस्थित केला.

त्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पंचक्रोशीतील गावांची म्हणजे ईआयए अधोसूचनेनुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील सर्व गावांची आहे.

**२२) गीता संभाजी पाटील, राहणार घुंगुर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर-**

या प्रकल्पास आमचा पुर्ण विरोध आहे, कारण आमच्या रानातील डफूळ वगैरे सर्व विस्कटून टाकलेले आहे.

त्यावर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की येथे ब-याच उपस्थितांनी आपल्या सूचना, विचार, आक्षेप नोंदविलेले आहेत. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांच्याच भूमिका समजावून घेतलेल्या आहेत. तरी प्रस्तावित प्रकल्पाविषयी कोणालाही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

**२३) श्री सुरेश पांडुरंग भोसले, राहणार-परळी, तालुका- शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-**

माझे गाव कासरवाडी हे डोंगरमाध्याच्या वर आहे व प्रस्तावित प्रकल्पापासून १००.० मीटर अंतरावरसुध्दा नाही तसेच माझ्या वाडीचे पाणी हे डोंगरातूनच येते व माझी शेती ही २२३ गट नंबरवर आहे यामुळे हा प्रकल्प माझ्या शेतात करण्यात येत आहे.

**२४) श्री जीवन मानसिंग सावरे, राहणार घुंगूर, ता. शाहूवाडी, जिल्हा कोल्हापूर.**

श्री जीवन यांनी इंग्रजीत सांगितले की मी या प्रस्तावित प्रकल्पाच्या विरुध्द आहे व मायनिंग प्रकल्प मर्यादित प्रमाणात ठेवण्यासाठीचा मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची माहिती दिली. तसेच भारत

सरकारने फक्त ३३ मायनिंग प्रकल्प लिजवर पश्चिम महाराष्ट्रातच दिलेले आहेत त्यापैकी फकत २८ प्रकल्प कार्यान्वित आहेत.

तदनंतर अध्यक्ष यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपली भूमिका मांडण्याची सूचना केली. त्यावर श्री जीवन सावरे यांनी मत मांडले की येथील लोकांना रोजगाराची गरजच नाही, तर बॉक्साईट मायनिंग कशासाठी चालू करण्यात येत आहे?

२५) **<u>सविता शामराव खोत, राहणार-घुंगुरवाडी, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

गेले पाच वर्षे येथील माणसे माझी ओळख विसरले होते व येथे वनविभागाचे कोणीही आलेले आहेत का, त्यांनी आम्हांला लाकडे तोडू दिली नाहीत. आम्हांला रोजगाराची गरज नाही कारण आम्हांला शेतीत रोजगार आहे त्यामुळे प्रकल्पास आमचा विरोध आहे.

२६) **<u>सीमा लुगडे, राहणार-सावर्डे बुद्रुक, तालुका-शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

आमच्या गावाला पाणीटंचाई आहे. आम्ही येथे उन्हात उभारलो आहोत, आमचेसारखे उन्हात उभे राहून दाखवा. कारण प्रकल्पासाठी झाडे तोडतात व स्वत: सावतील जाऊन बसत आहात, आमच्या बरोबर उन्हात उभे राहून दाखवा, आमचे गाव या डोंगराच्या पाण्यावर आहे.

अध्यक्ष यांनी सांगितले की पाण्याच्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

२७) **<u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राहणार-तेलंगणा:-</u>**

मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो औद्योगिक विकासाचे समर्थन करत असतो. मायनिंग हे शासनाची मालमत्ता आहे. शासनास मायनिंग भाड्याने देण्याचा किंवा विकत देण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यावर अध्यक्ष यांनी श्री रेड्डी यांना थोडक्यात मुद्दे सांगण्याची सूचना केली.

त्यापुढे श्री रेड्डी यांनी मत मांडले की भारतातील बेरोजगारी हे सर्वात मोठे प्रदूषण आहे. ते विविध उद्योगात रोजगाराची संधि मिळाल्याने कमी होऊ शकते. त्यावर अध्यक्ष यांनी श्री रेड्डी यांना लेखीस्वरुपात विचार मांडण्याची सूचना केली.

अध्यक्ष यांनी सांगितले की उपस्थितांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ज्यांना लेखी स्वरुपात निवेदन, सूचना वा आक्षेप नोंदवायचा आहे, त्यांनी तो स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात सादर करावा.

२८) **<u>श्री महादेव श्रीपती पाटील, राहणार-साळशी, तालुका- शाहूवाडी, जिल्हा-कोल्हापूर:-</u>**

या तालुक्यात कैलासवासी गायकवाड, खासदार यांनी साखर कारखाना काढला, अशी मुदयाची सुरुवात करत असताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यानी मुद्दे सर्व प्रकारचे उपस्थित करण्यात आलेले आहेत, तरी प्रकल्पास पाठिंबा आहे वा विरोध आहे, तेवढेच सांगण्याची सूचना केली.

त्यावर श्री महादेव पाटील यांनी आमच्या गटातर्फे या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रकल्पास पाठिंबा देताना सांगितलेले मुद्दे व विरोध करताना सांगितलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. ज्यांना लेखी स्वरुपात सूचना, आक्षेप सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यात यावे. सर्वांनी आपले मुद्दे व्यवस्थित मांडले, त्याबद्दल सर्वांचे आभार मानून ही जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

वर जनसुनावणी अगोदर या कार्यालयास टपालाव्दारे, व्यक्तीश: १९५ व ई-मेल व्दारे ०३ तसेच जनसुनावणी दरम्यान देण्यात आलेले लेखी १५३० सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त झालेल्या निवेदनांच्या प्रती / सूचना व प्रकल्प धारकाने सादरीकरणाच्या (Presentation) छायांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

**(प्रमोद राजाराम माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(जयवंत हजारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(संजय तेली)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा – कोल्हापूर